## नोंदणी उपमहानिरीक्षक कार्यालयातील कामकाज

## (FUNCTIONS IN DY.INSPECTOR GENERAL OF REGISTRATION OFFICE)

- नोंदणी उपमहानिरीक्षक हे त्या प्रादेशिक विभागाकरीता विभाग प्रमुख म्हणून काम करतात.

- प्रादेशिक विभागातील सह जिल्हा निबंधक व दुय्यम निबंधक कार्यालयांचे कामकाजावर प्रशासकीय नियंत्रण नोंदणी उपमहानिरीक्षकांकडुन ठेवले जाते. सह जिल्हा निबंधक व दुय्यम निबंधक कार्यालयांच्या कामकाजाच्या तपासण्या नोंदणी उपमहानिरीक्षकांकडुन केल्या जातात.
- मुंबई वगळता, उर्वरीत प्रादेशिक विभागांचे नोंदणी उपमहानिरीक्षक हे त्या त्या प्रादेशिक विभागाकरीता मुद्रांक उपनियंत्रक म्हणून देखील काम करतात व त्या अधिकारात खालील कामे पार पाडतात.
    1. मुद्रांक परताव्याबाबत रुपये 1 लाखावरील व 10 लाखापर्यंतचे परतावा मागणी प्रकरणांना मंजुरी देणे.
    2. 2.मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी मुद्रांक शुल्क आकारणी करतांना, निश्चित केलेले बाजारमूल्य पक्षकारांना मान्य नसल्यास,त्याविरुध्दचे अपील चालविणे.

- मुंबई विभागामध्ये,मुद्रांक उपनियंत्रक पदाचे कामकाज अपर मुद्रांक नियंत्रक यांचेकडुन पार पाडले जाते.